डोंगरे यांच्या
बालामृतानें
अशक्त मुलें
सशक्त होतात.

REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख २० मार्च १९४६ अंक १२

श्री श्री श्री श्री श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

कंपनीनें चार लक्ष रुपयांचे ऑर्डिनरी शेअर दर शेअरला
रु. ५ प्रिमिअम असे विक्रीस काढले आहेत.

युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री श्री श्री श्री श्री

# विविध माहिती

**फ्रान्समध्यें काळाबाजारावर करडी नजर**

फ्रान्समध्यें काळाबाजारासंबंधीं आरोपींना यापुढें जामिनावर सुटका नसून नेहमींच्या शिक्षेव्यतिरिक्त धंदा करण्यास मनाई व बाजारपेठेंतून हकालपट्टी ह्याही शिक्षा देण्यांत येतील.

**मुंबई इलाख्यांत आणखी एक इंजिनिआरिंग कॉलेज**

मुंबई इलाख्यांत आणखी एक इंजिनिअरिंग कॉलेज स्थापण्याच्या उद्देशानें मुंबई सरकारनें सर आर्देसर दलाल यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति नेमली आहे. या समितीनें आपला रिपोर्ट १ मे चे आंत करावयाचा आहे.

**सैन्यांतील अधिकारी तयार करण्याचें विद्यालय**


सैन्याला लागणारे अधिकारी तयार करण्याचें विद्यालय पुण्याजवळील खडकवासल्याचे तळ्याजवळ स्थापन करण्याचें ठरलें आहे. यासाठी सध्या २००० एकर जागा घेण्यांत येईल. यंदाचे-सालीं या कामीं ५ लक्ष रुपये खर्ची पडतील. गेल्या महायुद्धांत सुदानच्या संरक्षणांत हिंदी सैनिकांनीं केलेल्या अमोल कामगिरीबद्दल त्या देशानें हिंदी राष्ट्राला दिलेल्या १ लक्ष पौंडांच्या देणगीचाही या विद्यालयाचे कामीं उपयोग करण्यांत येईल.

**संयुक्त राष्ट्रमंडळांतील अधिकाऱ्यांच्या जागा**

संयुक्त राष्ट्रमंडळांतील अधिकाऱ्यांच्या जागांपैकीं हिंदुस्थानालाही योग्य वांटा मिळावा याबद्दल हिंदी शिष्टमंडळाला योग्य सूचना दिल्या असल्याचें परराष्ट्र चिटणिसांनीं मध्यवर्ती विधिमंडळांत सांगितलें.

**हिंदी विमानांचा कारखाना**

हिंदुस्थानांत विमानें तयार करतां येतील का नाहीं याचें निरीक्षण करण्यासाठीं विलायतेंतून एक तज्ञांची टोळी हिंदुस्थान सरकारनें बोलावली आहे.




—महाराष्ट्र सोल एजंट—
मे. जयप्रकाश ॲण्ड को
२५५।४ सदाशिव, पुणें

**हिंदी शेती सुधारण्यासाठीं अमेरिकन मंडळ**

हिंदुस्थानांत शेतीची सुधारणा होऊन अधिक धान्य कसें पिकेल याचें संशोधन करण्यासाठीं हिंदुस्थानांत एक अमेरिकन मंडळ येत आहे. या मंडळामध्यें अमेरिकन शेतकी खात्यांतील अधिकाऱ्यांचा भरणा नसून शेतकी विद्यालयांतील लोकांचा आहे; आणि ही निवड करतांना हिंदुस्थानांत पाटबंधाऱ्यांत सुधारणा कशी करावी हा जरूरीचा प्रश्न नजरेसमोर ठेऊन केली आहे. हें मंडळ हिंदुस्थान सरकारच्या विनंतीवरून या देशांत येत आहे.

**इटालिअन कैदी**

हिंदुस्थानांत अद्याप २६,१७२ इटालिअन युद्धकैदी आहेत अर्थात त्यांचा खर्च साम्राज्य-सरकार सोशीत आहे.

**औद्योगिक सहकारी शिक्षण देणारे वर्ग**

औद्योगिक सहकारी शिक्षण देणारे वर्ग २५ मार्चपासून मुंबईस सुरू होतील. शिक्षण १० आठवडे देण्यांत येईल, त्यापैकीं ६ आठवडे मुंबईच्या वर्गांत देण्यांत येईल व ४ आठवडे होनावरास शेतावर देण्यांत येईल. शिक्षण इंग्लीशमधून देण्यांत येईल. विद्यार्थी सर्व जिल्ह्यांतून घेतले जातील. फी ५० रुपये आहे. परंतु जे विद्यार्थी जिल्ह्यांतून आर्गनायझर म्हणून काम करण्यास तयार असतील त्यांस फी माफ. गुजराथी विद्यार्थ्यांनीं श्रीमती मृदुलाबेन साराभाई, अहमदाबाद यांचेकडे अर्ज करावे. महाराष्ट्रांतील विद्यार्थ्यांनीं श्री. शेंडे, कॅमिसभुवन पुणें यांचेकडे अर्ज करावे व कर्नाटकांतील विद्यार्थ्यांनीं श्री. कल्लापूर, होनावर यांचेकडे अर्ज करावे.

**मुंबईमधील कापड गिरण्या**

गिरणी मालकांनीं प्रसिद्ध केलेल्या माहितीवरून गेल्या वर्षांतील ह्या धंद्याची मुंबईची प्रगति खालीलप्रमाणें झाली. गेल्याचे मागील वर्षीं मुंबईत ५५ गिरण्या होत्या त्या गतवर्षीं ६५ झाल्या म्हणजे एका वर्षांत १० नवीन गिरण्या झाल्या. यांत अनुक्रमें ५२ कोट रु. व ५४ कोट रु. भांडवल गुंतलें होतें म्हणजे एक वर्षांत भांडवल २ कोटींनीं वाढलें. या मुदतींत १६ हजार चात्या व १००० माग वाढले व या मुदतींत ३२ हजार खंडी अधीक कापूस गिरण्यांना लागू लागला व पूर्वीपेक्षा ४ हजार अधीक मजूर कामावर घ्यावे लागले. हिंदुस्थानांत या मुदतींत ४०७ च्या ४१७ कापड-गिरण्या झाल्या म्हणजे नवीन दहाही गिरण्या मुंबईतच स्थापन झाल्या.

**रेशनिंग**

१७ मार्च १९४६ पासून २४ पेक्षां अधिक माणसांना जेवावयास घालणें हा रेशनिंग कायद्याखालीं गुन्हा आहे.

**हिंदी राजरस्त्यांची सुधारणा**

हिंदी राजरस्त्यांची सुधारणा सुचविण्यासाठीं दोन अमेरिकन तज्ञ हिंदुस्थान सरकारनें आणविले आहेत.

**कॉमर्स कॉलेजांतील शिक्षणाचें माध्यम**

वर्धा येथील कॉमर्स कॉलेजनें येत्या वर्षांपासून हिंदी व मराठी ह्यांतून शिक्षण देण्यास प्रारंभ करण्याचें ठरविलें आहे. कॉलेजचे प्राध्यापक, श्री. अग्रवाल, ह्यांच्या प्रयत्नांचें हें फळ आहे.










पुणें चीफ एजंटस:—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें.




छत्रे यांचा -कोल्हापुरी- संगीत चिवडा
वापरून पाहुण्यांस खूष ठेवा.
किंमत १ रत्तलाला २ रुपये.
मालक:—एन. व्ही. वेलणकर, गिरगांव रोड,
फो. नं. ३३८४९ ] मुंबई ४.

# हिंदुस्थानांतील साखरेचें उत्पादन

१९४४–४५ मध्यें हिंदुस्थानांत एकूण ९,५३,५०० टन साखर तयार झाली होती; १९४५–४६ मधील उत्पादनाचा अंदाज ११,११,९०० टनांचा आहे. म्हणजे, उत्पादनांत १ लक्ष, ५८ हजार टनांची वाढ अपेक्षित आहे. ही वाढ मुख्यतः संयुक्त प्रांत व बिहार ह्यांतीलच आहे. बंगालमधील उत्पादन दुप्पट झालें तरी टनांत मोजतांना तें फारसें भरणार नाहीं. १९४४–४५ मध्यें एकूण १४० साखर कारखाने चालू होते; आतां १४२ चालू आहेत. त्यांची प्रांतवार वाटणी खालीलप्रमाणें आहे:—

| | | | |
|---|---|---|---|
| संयुक्तप्रांत | ६६ | बिहार | २९ |
| मद्रास | ११ | मुंबई | १० |
| बंगाल | ६ | पंजाब व सरहद्दप्रांत | ३ |
| ओरिसा | १ | संस्थानें | १६ |

### उत्पादन अंदाजापेक्षा कमी होणार

किती ऊस गाळला जाईल, ह्यावर साखरेचें उत्पादन अवलंबून असतें, आणि त्यांत साखरेचा उतारा हाहि एक महत्त्वाचा भाग आहे. १९४४–४५ मध्यें ९३½ लक्ष टन ऊस गाळण्यांत आला, त्याची ९,५३,००० टन साखर झाली; म्हणजे उतारा १०·२१% पडला. १९४५–४६ मध्यें ११०¾ लक्ष टन ऊस गाळण्यांत येईल, त्याची ११,११,९०० टन साखर होईल व साखरेचा उतारा १०·०४% पडेल, असा अधिकृत अंदाज आहे. साखर कारखान्यांनीं पुरविलेल्या माहितीवरूनच हे अंदाज बांधलेले असतात. परंतु, त्यांनीं माहिती पुरविल्यानंतरची अवर्षणाची परिस्थिति लक्षांत घेता, उसाचें पीक अपेक्षेइतकें समाधानकारक नाहीं आणि अंदाजापेक्षा साखरेचें उत्पादन कमी होईल, असें आतां प्रसिद्ध झालें आहे. साखरेची परिस्थिति सुधारत आहे व उत्पादन वाढलें आहे, त्यामुळें सर्व प्रांतांचा साखरेचा कोटा वाढणार, अशी बातमी डिसेंबर, १९४५ मध्यें प्रसिद्ध झाली होती. उसाचा पुरेसा पुरवठा होत नसल्याकारणानें, साखरेचें उत्पादन घटत आहे त्यामुळें साखरेचा कोटा वाढण्याची आतां फारशी आशा दिसत नाहीं.

### प्रांतवार वाटणींत मुंबईचें स्थान

साखरेच्या धंद्यांत मुंबई प्रांताचें ( त्यांत महाराष्ट्र हाच मुख्य आहे ) स्थान दर्शविणारे १९४५–४६ चे अंदाजी आकडे खालीं दिले आहेतः—

| प्रांत | गाळलेला ऊस ( टन ) | तयार साखर ( टन ) | साखरेचा उतारा % |
|---|---|---|---|
| संयुक्त प्रांत | ६२,१६,२०० | ६,२७,१०० | १०·२० |
| बिहार | २०,३७,६०० | २,१५,८०० | १०·६९ |
| पंजाब व सरहद्द | १,६३,५०० | १३,९०० | ९·८३ |
| मद्रास | ५,९३,४०० | ५२,९०० | ९·११ |
| मुंबई | ५,११,५०० | ७५,००० | १०·७९ |
| बंगाल | ३,०४,९०० | २५,३०० | ९·७५ |
| ओरिसा | २२,००० | २,२०० | १०·६५ |
| हिंदी संस्थानें | १०,४७,१०० | ९९,७०० | ९·७५ |
| | ११०,७६,२०० | ११,११,९०० | १०·२१ |

### १५ लक्ष टनांच्या उत्पादनाचा संकल्प

हिंदी औद्योगिक प्रगतीच्या योजना आखण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें कांहीं काळापूर्वी २९ उपसमित्या नेमल्या होत्या, त्यांनीं आपल्या सूचना मध्यवर्ती युद्धोत्तर पुनर्घटना धोरण कमिटीस सादर करावयाच्या होत्या. साखर उपसमितीनें आपला रिपोर्ट सादर केला आहे, त्यांत तिनें हिंदुस्थानांतील साखरेचें उत्पादन पांच वर्षांत १५½ लक्ष टनांपर्यंत गेलें पाहिजे, असें ध्येय ठरवून तें गाठण्यासाठी सूचना केल्या आहेतः ( १ ) सध्यांच्या कारखान्यांची उत्पादनशक्ति वाढवावी व ( २ ) नवे कारखाने स्थापन करावे, अशा दोन मार्गांनीं साखरेचें उत्पादन वाढवितां येणें शक्य आहे. २५० ते ८०० टनांच्या कारखान्यांत उत्पादनशक्ति वाढविण्यास प्रोत्साहन देण्यांत यावें व त्यांची कार्यक्षमताहि वाढवावी, असें उपसमितीचें म्हणणें आहे. १७ नवीन साखर कारखाने काढावेत, असें तिनें सुचविलें आहे. संयुक्त प्रांतांत आजच कारखान्यांची गर्दी असल्याकारणानें त्या प्रांतांत नवा कारखाना निघावयाचा नाहीं. बिहारमध्येंहि पुष्कळ कारखाने आहेत, परंतु त्यांत आणखी एकाची भर पडणार आहे. नवे कारखाने सर्व प्रांतांत वाटून देण्यांत आले आहेत. त्यास सुमारें १०½ ते ११½ कोटि रुपये भांडवली खर्च लागेल.

### परदेशी साखरेस तोंड देण्याची पूर्व तयारी

ह्यापुढें हिंदी साखर कारखान्यांस परदेशी साखरेशीं टक्कर द्यावी लागेल हें उघड आहे. ही स्पर्धा हिंदुस्थानांत तर होईलच, परंतु ज्या देशांत हिंदुस्थान साखर निर्गत करील, तेथेंहि ती जाणवेल. ह्या दृष्टीनें, उत्पादनाचा खर्च कमी करणें आवश्यक आहे. तो कमी करण्यास वाव मिळावा, ह्या दृष्टीनें संरक्षण व जकात हीं हळूहळू कमी करण्यांत यावीत, असें साखर उपसमितीचें म्हणणें आहे. साखरेच्या धंद्यास दिलेल्या संरक्षणाची मुदत ३१ मार्च, १९४७ रोजीं संपत आहे.

---

# कपास कापडाच्या हिंदी गिरण्या

| ३१ ऑगस्ट अखेरचें वर्ष | १९४४ | १९४५ |
|---|---|---|
| गिरण्यांची संख्या | ४०७ | ४१७ |
| वसूल भांडवल | ५२·७१ कोटि रु. | ५४·३६ कोटि रु. |
| चात्यांची संख्या | १,०२,२२,१०७ | १,०२,३८,१३१ |
| मागांची संख्या | २,०१,७६१ | २,०२,३८८ |
| कामगार संख्या | ५,०५,५६२ | ५,०९,७७८ |
| सुताचें उत्पादन | १६३ कोटि पौंड | १६४ कोटि पौंड |
| वापरलेली कपास | ४८½ लक्ष गाठी | ४९ लक्ष गाठी |
| कापडाचें उत्पादन | १२१ कोटि पौंड | ११८ कोटि पौंड |

### मुंबई प्रांताबाहेर नव्या गिरण्यांची स्थापना

हिंदुस्थानांतील एकूण गिरण्यांपैकी ६५ गिरण्या मुंबई शहरांत, ७४ अहमदाबादमध्यें, ७० मुंबई प्रांतांत इतरत्र व २०८ मुंबई प्रांताबाहेर आहेत. गेल्या वर्षी १० गिरण्यांची भर पडली, त्यांपैकीं ८ गिरण्या मुंबई प्रांताबाहेर स्थापन झाल्या. मुंबई शहरांतील गिरण्यांची संख्या स्थिर राहिली आहे. नव्यानें निघत असलेल्या १४ गिरण्यांपैकीं १३ गिरण्या इतर प्रांतांतच निघत आहेत.

## आंतरराष्ट्रीय राजकारणांत वादळी वारे

### स्पेन, ग्रीस, इराण आणि मांच्युरिआ

दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन करण्यांत आलेल्या संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या सुरक्षितता समितीची बैठक २५ मार्चला न्यूयॉर्क येथें भरणार आहे. सुरक्षितता समितीच्या लंडनला झालेल्या बैठकींत ब्रिटन विरुद्ध रशिया असें द्वंद्व ब्रिटनचे परराष्ट्रमंत्री मि. बेव्हिन आणि रशिअन प्रतिनिधि मंडळाचे प्रमुख एम. व्हिशिन्स्की यांनीं आपल्या कडवट वादविवादानें प्रकट केलें. ब्रिटनचे युद्ध-कालीन मुख्य प्रधान मि. चर्चिल यांनीं फूल्टन येथें एक भाषण करून मि. बेव्हिन यांच्या रशियाविरोधी धोरणाला अमेरिकेंत पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला. कलकत्याच्या अमृतबझार पत्रिकेच्या वॉशिंग्टनमधील वार्ताहरानें अशी माहिती पाठविली आहे कीं, मि. चर्चिल यांचें भाषण अमेरिकेचे प्रे. ट्रुमन आणि पर-राष्ट्रीय चिटणीस मि. बर्न्स यांना माहीत होतें. "ॲटम बाँबचें गुपित संयुक्त राष्ट्रसंघाला सध्यांच्या जगाच्या अनिश्चित परिस्थि-तींत देणें म्हणजे वेडाच्या लहरींतील गुन्हेगारी आहे" असे उद्गार मि. चर्चिल यांनीं काढतांच प्रे. ट्रुमन यांनीं मनापासून टाळ्या पिटल्या असेंहि सूचक वृत्त वरील बातमीदारानें दिलें आहे. मि. चर्चिल यांच्या भाषणाचा समाचार रशियाचे मुख्य प्रधान एम. स्टॅलिन यांनीं स्वतःच घेतला असल्यामुळें रशिअन वृत्तपत्रांच्या मि. चर्चिल यांच्या भाषणावरील टीकेबद्दल लिहि-ण्याचें कारणच राहिलेलें नाहीं. चर्चिल आणि त्यांचे स्नेही हिटलरच्याच पावलावर पाऊल टाकून सोव्हिएट रशियाविरोधी प्रचार करून जागतिक शांततेला धोका आणीत आहेत असा प्रत्यारोप एम. स्टॅलिन यांनीं आपल्या भाषणांत केला आहे.

#### स्पेन

आंतरराष्ट्रीय राजकारणांत वाहूं लागलेल्या या वादळी वाऱ्याचीं चार प्रमुख केंद्रें आहेत, पैकी पहिलें केंद्र स्पेन हें आहे. स्पेनच्या लोकशाही सरकारविरुद्ध हिटलरची व मुसोलिनीची लष्करी मदत घेऊन जनरल फ्रँकोनें आपली फॅसिस्ट राजवट स्थापन केली हें सर्वश्रुतच आहे. कांहीं दिवसांपूर्वी कांहीं स्पॅनिश लोकसत्तावाद्यांना फ्रँकोनें फांसावर चढविलें. त्यामुळें फ्रेंच सर-कारनें फ्रँको राजवटीचा प्रश्न सुरक्षितता समितीपुढें आणावा आणि स्पेन बरोबरचे राजकीय संबंध तोडावे असा तगादा इंग्लंड व अमेरिका यांच्या मागें लावला. परंतु स्पेनच्या राज्य-संस्थेचा प्रश्न तेथील जनतेचा असल्यानें त्या बाबतींत आपण हात घालूं इच्छित नाहीं अशी भूमिका इंग्लंड व अमेरिकेच्या सरकारांनीं आज तरी घेतलेली आहे. स्पेनच्या राजवटीपासून आंतरराष्ट्रीय शांततेला धोका आहे या मताला पुष्टि देणारी माहिती जोआकिन गार्शिया यांनीं प्रकट केली आहे. या माहिती-प्रमाणें स्पेनमध्यें ६ हजार जर्मन शास्त्रज्ञ असून त्यांपैकी कांहीं ॲटॉमिक शक्तीसंबंधीं प्रयोग करीत आहेत. युद्धोत्तर जगांत बाजारपेठा काबीज करण्यासाठी स्पॅनिश कारखानदारांना हे शास्त्रज्ञ मदत करीत आहे. स्पेनमधील जर्मनांच्या वर्चस्वाविषयीं बोलतांना तेथील पूर्वीच्या जर्मन वकिलातींतील लष्करी अधिकारी हॅन्स डोएर यांनीं असें स्वच्छ सांगितलें कीं "स्पेनच्या कार-खानदारींत पुष्कळ अमेरिकन भांडवलदारांचे हितसंबंध गुंतलेले असल्यानें पॉटसडॅम परिषदेंत स्पेनविरुद्ध केलेल्या ठरावाची आम्हांला मुळींच भीति वाटत नाहीं. इंग्लिश आणि अमेरिकनांनीं स्पेनविरुद्ध युद्ध जोंपर्यंत जाहीर केलेंं नाहीं तोंपर्यंत ते फ्रँकोचें कांहींहि वाकडें करूं शकत नाहींत."

#### ग्रीस

ग्रीसमधील निवडणुकी ता. ३१ मार्च रोजीं व्हावयाच्या आहेत. ब्रिटिश लष्कराच्या बळावर ग्रीसमधील लोकशाहीचे विरोधक सुलतानशाही गाजवीत आहेत असा आरोप ग्रीसमधील डाव्या गटाचे लोक करीत आहेत. गेल्या नोव्हेंबर-मध्यें ब्रिटिश परराष्ट्रीय खात्याचे पार्लमेंटरी उपचिटणीस मि. मॅकनिल हे ग्रीसच्या परिस्थितीची पहाणी करण्यासाठी गेले होते. त्यावेळीं खुद्द ग्रीक कोर्टांनींच अथेन्समधील ९० मतदारांच्या याद्या अयोग्य रीतीनें तयार केलेल्या व म्हणून नियमबाह्य ठर-विल्या. संयुक्त राष्ट्रांच्या मदत (अनरा) समितीनें समितीचे डायरेक्टर मि. लेहमन यांच्याकडे अशी तक्रार केली कीं, समिती-तर्फे देण्यांत येणाऱ्या मदतीचा राजकीय दृष्ट्या उपयोग करण्यांत येत आहे त्यामुळें ग्रीक लोकांना मदत मिळणें दुरापास्त झालेलें आहे. ग्रीसमधील इएम या डाव्या गटाचे ३ लाखांवर लोक तुरुं-गांत आहेत अगर डोंगरांत पळून गेलेले आहेत. अशा परिस्थितींत ग्रीसमधील निवडणुका खुल्या वातावरणांत होणार नाहींत असें या व इतर कांहीं पक्षांचें मत आहे.

#### इराण

गेल्या आठवड्याच्या मध्याला सोव्हिएट लष्कर तेहरानवर चाल करून येत आहे अशा वार्ता वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाल्या. ता.२ मार्चला अँग्लो–रशियन–पर्शियन तहाप्रमाणें रशियानें इराण-मधील आपलें सैन्य काढून घ्यावयाचें असें ठरलेलें अस-तांना रशियन लष्करी हालचालींची ही बातमी आल्यावर सर्व जगभर खळबळ उडाली. दक्षिण इराणमधील भटक्या टोळ्यांना ब्रिटन शस्त्रास्त्रें पुरवीत आहे असा आरोप रशियानें केलेला आहे. अमेरिकेंतील हौस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्हचे एक सभासद मि. मुन्डर यांनीं माहिती सांगितलेली आहे कीं इराणच्या महंमद रेझा पेहलवीच्या सरकारला लष्करी सल्लामसलत देण्याचा दोन वर्षांचा करार अमेरिकेनें केलेला आहे. कर्नल नॉर्मन स्वार्झकॉफ हा अमेरिकन लष्करी मंडळाचा प्रमुख असून त्याच्या नेतृत्वाखाली असलेल्या इराणी फौजेलाच आझार बैजन प्रांतांत शिरण्यास रशियन लष्करानें मज्जाव केला. कर्नल स्वार्झकॉफ हे सोव्हिएट रशियाचे कट्टर द्वेष्टे आहेत. सोव्हिएट रशियाला ब्रिटन व अमे-रिकेची ही वागणूक आपल्या विरुद्ध चालली आहे असा वास येत आहे. रशियन राज्यकर्त्यांच्या संशयाला मागील इतिहासाचा आधार असून ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्रीय मंत्री मि. हर्बर्ट ईव्हट यांनीं रशियाचें आंतरराष्ट्रीय धोरण फक्त आत्मसंरक्षणाचें आहे अशी आपली खात्री असल्याचें बोलून दाखविलें.

#### मांच्युरिया

मांच्युरियांतील जपानचे कारखाने रशियानें आपल्या हद्दींत नेले अशी बातमी आलेली आहे. जपानकडून घ्यावयाची नुकसान-भरपाई इंग्लंड, अमेरिका व रशिया तिघांनीं मिळून ठरवावी असें अमेरिकेचें म्हणणें आहे. अमेरिकेचें जपानमधील व चीनमधील धोरण सोव्हिएटविरोधी आहे अशी शंका रशियाला येत आहे. मांच्युरियांतील जपानी सैनिकांना निःशस्त्र करून जपानांत पाठविण्या-ऐवजीं सोव्हिएट सैबेरिआच्या हद्दीवर धाडण्यांत येतें अशी बातमी आहे. ती खरी असेल तर रशियाला शंका येण्यास जागा आहे असें म्हणावें लागेल. रशियानें मांच्युरियांत अजून आपलें सैन्य कां ठेवलें आहे अशी पृच्छा अमेरिकेनें केलेली आहे. एकंदरीनें आंतर-राष्ट्रीय परिस्थितींत इंग्लंड–अमेरिका विरुद्ध रशिया असें तट पडले असून दाट संशयाचें वातावरण निर्माण झालें आहे.

# मुंबई शेअर बाजार

वर्ग पुस्तकें बंद

गोकाक मिल्स १-३-४६ } २१-३-४६ }
अपोलो मिल्स १-३-४६ ते २३-३-४६

व्याज-वजा

कोहिनूर—२८-३-४६ अपोलो—२९-३-४६
+ फिनले मिल्स रु. १५ दि. १४-३-४६
डाइंग रु. ५० दि. ८-४-४६
गोकाक रु. ८ दि. ८-४-४६

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार ११।३।४६ | मंगळवार १२।३।४६ | बुधवार १३।३।४६ | गुरुवार १४।३।४६ | शुक्रवार १५।३।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | | ३०१५—० | ३०१७—८ | ३०१०—० | |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | ५४६—८ | ५४१—८ | ५३६—० | |
| २२२२-८; १७६१-१२ | ५०-०-० S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | | २४९७—८ | २४८५—० | २४३५—० | |
| ७०२; ५६६ | १९—० † | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | | ८६८—० | ८७४—० | ८७१—० | |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | | ७४४—० | ७४०—० | ७३८—० | |
| ४४३-८; ३६० | ९-०-० S | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | | ४९७—० | ४९६—० | ४८४—० | |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | | ४२३—० | ४२४—० | ४०५+ | |
| ३३५; २८३-८ | ८-०-० S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | | ३६९—० | ३६८—८ | ३६२—० | |
| ३३७; २४३ | ४-०-० † | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | बाजार | ४०४—० | ३९८—० | ३९०—० | |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | | ५-१०-६ | ५-१०-६ | ५—८-० | |
| १७-१०; १३-७-० | ०-१५-८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | बंद | २०-१३ | २०-१० | १९-१२ | |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | | ४—०-३ | ४—०-९ | ३-१५-६ | |
| ७९०; ६४५ | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | ८०५—० | ८१५—० | ८२२—८ | |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | | २६४—० | २६१—८ | २५८—० | |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | २७५—० | २७४—८ | २६८—० | |
| ५९२-८; ५१०-० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | ६४१—४ | ६४७—८ | ६४२—८ | |
| ४३-७; ३०-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | | ४६—८ | ३९—२ | ३८—१० | |
| | | | ३½% रोखे | १०० | | १०२-१२ | १०३-१३ | १०२-१४ | |

सोमवार, दि. १८ मार्चला होळीनिमित्त बाजार बंद होता.

गुरुवार दि. १४-३-४६ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०१-१० | बरोडा | १७७—० | आंध्रा व्हॅली | १८८५-० | अलकॉक | ५०३-१२-० |
| १९५१-५४ | १०२—४ | सेंट्रल | १२४—८ | बॉम्बे ट्रॅम | १५८-० | बॉंबे स्टीम | ६७७—८ |
| १९५७ | १०१-१५ | इंडिया | २३९—० | टाटा हायड्रो | २२२-० | न्यू इंडिया | १०१—८ |
| १९५९-६१ | १०१-१५ | इंपी० | २४७७—८ | टाटा पॉवर | १९८५-० | शिवराजपुर | ६१—० |
| १९६३-६५ | १०१—१ | | ६४१—४ | | | टाटा केमिकल | २३—० |
| १९६६-६८ | १०१—१ | रिझर्व्ह | १५८—० | | | टाटा ऑईल | ११४—० |
| १९७०-७५ | १००—६-६ | युनियन | १३—४ | | | | |

दि. २१-३-४६ ला पारशी सणानिमित्त बाजार बंद आहे.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

महाराष्ट्र बँकेचे शेअर्स

विकत घेणें आहेत.

भावासंबंधीं चौकशी :—" क्ष " C/o अर्थ, पुणें ४.



पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. च्या सभासदांस विनंति

## नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेची सहामाही चर्चात्मक साधारण सभा रविवार ता. ३१।३।१९४६ रोजीं सायंकाळीं चार वाजतां बँकेच्या मुख्य दिवाणखान्यांत ( बुधवार पेठ लक्ष्मीरोड पुणें शहर ) भरणार आहे. तरी सदर सभेस बँकेच्या सर्व सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंति आहे.

बोर्डाच्या हुकमावरून

पुणें शहर
१४-३-१९४६

द. वि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर




महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे
पहिले व फक्त १ च
*गोल्ड् मेडॅलिस्ट् व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट्*
**पेन्टर बेडेकर, ए. जी.,**
बुधवार चौक, पुणें २ (सिटी)
बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.




—: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसही पाठवूं शकूं.

——साठे बिस्किट कं., पुणें २

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच
**खादी मन्दिर**
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-treaders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष : श्री. माधव रामचंद्र जोशी, बी. ए. कागदाचे व्यापारी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## स्फुट विचार

### मुंबई क्लिअरिंग हाउसचे उप-सभासद

कलकत्ता, मुंबई, मद्रास, इत्यादि शहरांत बँकांचीं क्लिअरिंग हौसेस आहेत. इंपिरिअल बँक, रिझर्व्ह बँक, बहुतेक एक्सचेंज बँका, इंग्लिश बँकिंग एजन्सी फर्म्स व कांहीं हिंदी जॉइंट स्टॉक बँका ह्या तेथील क्लिअरिंग हाउसच्या सभासद असतात. म्हणजे, क्लिअरिंग हाउसमध्यें विदेशी बँका व मोठ्या हिंदी बँका ह्यांचेंच प्रस्थ असतें. कोणत्याहि बँकेस सभासदत्व हक्कानें प्राप्त करून घेतां येत नाहीं; तिची निवड विद्यमान सभासदांनींच करावी लागते. मुंबईसारख्या केंद्रांत सेटलिंग बँकेचें काम रिझर्व्ह बँक करते, म्हणजे क्लिअरिंग हाऊसच्या सभासद बँकांचे प्रतिनिधी रोज तेथें ठराविक वेळीं जमतात आणि एकमेकांवरील चेक्सची वजावट करून निघणारें देणें किंवा येणें काढतात आणि तें सेटलिंग बँकेमार्फत भागवितात. अशा रीतीनें, सभासद बँकांची फार मोठी सोय होते. प्रत्येक बँकेस दुसऱ्या बँकेच्या कचेरींत जाऊन कौंटरवर चेक वटवून घेण्याचा त्रास पडत नाहीं. कांहीं बँकांना सभासद बँकांच्या द्वारा, सब-मेंबर म्हणून चेक्सचें क्लिअरिंग करवून घेण्याची सवलत दिलेली असते. आतां ह्यासंबंधांतील अटी कडक करण्याचें मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसनें ठरविलें आहे. क्लिअरिंग हाउसचे सभासद किंवा उप-सभासद होणाऱ्या बँकेचें वसूल भांडवल किमान ५ लक्ष रुपये पाहिजे व ती शेड्यूल्ड बँक असली पाहिजे म्हणजे रिझर्व्ह बँकेनें तिची तपासणी करून सरकारनें तिला रिझर्व्ह बँक कायद्याच्या दुसऱ्या परिशिष्टांत दाखल केलेली असली पाहिजे, असा नवा निर्बंध आतां घालण्यांत आला आहे. एकादी शेड्यूल्ड बँक शेड्यूलमधून वगळण्यांत आली, तर तिचें सभासदत्व किंवा उप-सभासदत्व रद्द व्हावयाचें आहे.

---

### आठ बँकांची गैरसोय होणार

सहकारी बँकांवर भांडवलाची ही अट नाहीं, त्यामुळें लहान-सहान सहकारी बँका पूर्वीप्रमाणेंच उप-सभासद म्हणून राहूं शकतील. परंतु, बिगर शेड्यूल्ड आठ जॉइंट स्टॉक बँकांची फार मोठी गैरसोय होणार आहे. त्या आठ बँका आज उप-सभासद ह्या नात्यानें क्लिअरिंगच्या सोईचा फायदा घेत आहेत. त्यांनीं १ जानेवारी, १९४७ पूर्वी शेड्यूल्ड बँकेचा दर्जा प्राप्त करून घेतला नाहीं, तर त्यांचे चेक्स क्लिअरिंग हाऊसमध्यें त्यांच्या क्लिअरिंग एजंटमार्फत येऊंच शकणार नाहींत. ह्याचा अर्थ, त्या आठ बँकांना इतर बँकांच्या दारोदार जाऊन चेक्सची वसुली करावी लागेल व चेक्सच्या वसुलीसाठी भरमसाट खर्च करून शिवाय आपल्या गिऱ्हाइकांची गैरसोय करावी लागेल. थोडक्यांत म्हणजे त्यांना मुंबई शहरांत काम करणेंच अशक्यप्राय होईल. प्रस्तुत आठ बिगर-शेड्यूल्ड बँकांनीं १९४७ पूर्वी शेड्यूल्ड बँकेचा दर्जा प्राप्त करून घ्यावा, हें म्हणणें क्लिअरिंग हाऊसच्या बड्या सभासदांना सोपें आहे, परंतु भांडवल उभारणीस परवानगी मिळवणें, तें खपविणें, रिझर्व्ह बँकेच्या तपासणीस उतरणें, वाढलेल्या भांडवलावरील डिव्हिडंडची जबाबदारी पत्करणें, इत्यादि गोष्टी घडवून आणण्यास देण्यांत आलेला अवधि अपुरा आहे. तेव्हां तो वाढविण्यांत यावा, अशी त्या बँकांची तक्रार आहे. भांडवलाची वाढ पुरी करून रिझर्व्ह बँकेच्या शेड्यूलमध्यें दाखल होण्यास दिलेली सवड पुरेशी नाहीं; ५ लक्ष रुपयांची अट पुरी केल्यावर कांहीं काळ लोटूं देऊन नंतर दुसऱ्या अटीच्या पूर्ततेची सक्ती करण्यास हरकत नाहीं, असें त्यांचें म्हणणें आहे. मुंबईमधील कचेरी बंद करावयास भाग पाडणारी नवी अट सैल करवून घेण्याचें काम रिझर्व्ह बँकेनें हातीं घेणें आवश्यक आहे आणि ह्यासाठी प्रस्तुत आठ बँकांनीं जरूर प्रयत्न केले पाहिजेत. उप-सभासद बँकांची किमान लायकी केवढी असावी, हें ठरलें तरी ती मिळविण्यास त्या बँकांना शक्य ती सवलत मिळणें अगत्याचें आहे.

---

### श्री. ग. रा. साठे ह्यांचें भाषण

प्रेसिडेन्सी इं. बँकेच्या नवव्या वार्षिक सभेंत बँकेचे अध्यक्ष, श्री. ग. रा. साठे, ह्यांनीं बोर्डानें सादर केलेल्या ताळेबंदास व अहवालास मंजुरी मागतांना सद्यःपरिस्थितीविषयीं जे उद्गार काढले, त्याकडे वाचकांचें लक्ष वेधणें आवश्यक आहे. अन्नवस्त्रादि पुरवठ्याबरोबरच कारखान्यास लागणाऱ्या कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा चालू ठेवून बेकारी वाढणार नाहीं, अशी खबरदारी घेतली जाणें आवश्यक आहे, असें त्यांनीं सांगितलें. व्यवहारांत असलेल्या जुन्या भारी किंमतीच्या नोटा बंद करण्यांतील उद्देश कितपत साध्य झाला, हा प्रश्नच आहे; तथापि जुन्या नोटा बंद करून नवीन भारी नोटा न काढल्याकारणानें बँकिंग व इतर आर्थिक देवघेवींचे व्यवहारांस अडचण निर्माण झाली आहे, अशी श्री. साठे ह्यांनीं टीका केली. " औद्योगीकरणाचा अभाव, बेकारी, काळा बाजार, इत्यादि गोष्टींमुळें आर्थिक व्यवस्थेंत निर्माण झालेला गोंधळ शक्य त्या सर्व उपायांनीं बंद करण्याचा सरकारनें प्रयत्न केला पाहिजे, " असें अध्यक्षांनीं सुचविलें. हिंदी बँकिंगची वाढ राष्ट्रीय सरकार अधिकारारूढ झालें, तरच होऊं शकेल, असें ते म्हणाले. टारिफ बोर्डाची नेमणूक व इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनची योजना ह्यांचाहि त्यांनीं उल्लेख केला. लहान व मध्यम धंद्यांस प्रेसिडेन्सी इं. बँकेसारख्या बँकांची उपयुक्तता दिवसेंदिवस वाढतच जाईल, असें सांगून स्वतःच्या बँकेच्या धर्तीवर इतरत्रहि बँका निघूं लागल्या आहेत त्या आपापल्या परीनें यशस्वी रीतीनें कार्य करीत असल्याबद्दल त्यांनीं समाधान व्यक्त केलें.

---

### दि युनियन बँक ऑफ कोल्हापूर, लि.

वरील बँकेचें वसूल भांडवल १,२२,७५० रुपये असून तिचेकडे १७¾ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेनें १० लक्ष रुपये रोख शिल्लक ठेवून, १ लक्ष रुपये कॉल डिपॉझिटसमध्यें गुंतवून व सुमारें १ लक्ष रुपयांचे रोखे धारण करून ६ लक्ष रुपयांवर कर्जे दिलेलीं आहेत. बँकेच्या १९ लक्ष, १३ हजार रुपयांच्या खेळत्या भांडवलावर तिला १९४५ सालीं २७,८२८ रुपये नफा झाला, म्हणजे नफ्याचें खेळत्या भांडवलाशीं प्रमाण चांगलें पडलें, असें म्हटलें पाहिजे. नफ्यापैकीं १० हजार रुपये फंडांत जाऊन ऑर्डिनरी शेअर्सना ९% कर माफ डिव्हिडंड मिळालें. बँकेनें तीन वर्षांच्या अवधींत उत्कृष्ट प्रगति केली आहे.

---

### १९४६ च्या कॅलेंडरांची पोंच

एस. आर. अभ्यंकर आणि कंपनी, पुणें २

व्ही. पी. बेडेकर, मुंबई.

द. ना. हेजीब, शुक्रवार पुणें

इंडस्ट्रिअल केमिकल वर्क्स, किर्लोस्करवाडी.

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | „ १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | „ ४,६२,३०० |
| एकूण खेळतें भांडवल | „ ५०,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलूएल. बी., मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे, मॅ. डायरेक्टर



# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

| अधिकृत भाण्डवल | विक्रीस काढलेलें व खपलेलें |
|---|---|
| रु. ५०,००,००० | रु. २५,००,००० |

वसूल झालेलें भांडवल रु. १२,५०,०००

रिझर्व्ह व इतर फंड रु. ३,००,०००

एकूण खेळतें भाण्डवल रु. १,५०,००,००० चे वर

★ बँकेच्या शेअर्सवरील डिव्हिडंडमध्यें क्रमशः वाढ होत आहे.

★ गतवर्षी शें. ५ टक्के डिव्हिडंड देण्यांत आलें.

—:शाखा:—

डेक्कन जिमखाना, (पुणें), खडकी, गिरगांव, मुंबई, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव व फैजपूर (पे-ऑफिस)

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर



# इनकँडीसंट लँप्स मॅन्युफॅक्चरिंग कंपनी, लिमिटेड

३७६ शुक्रवार, पुणें २.

सरकारी सप्लाय खात्याची गॅस बत्त्यांची मोठी ऑर्डर पुरी करण्याचें कार्य चालू आहे.

नवीन शेअर विक्रीस सरकारी मान्यता मिळाली असून विक्री सुरू आहे.

ठेवी स्वीकारल्या जातात
दराबद्दल चौकशी करा

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर



सुंदर व रसिक स्त्रियांची निवड



# आशा

Asha

सौंदर्य साधनें

विक्रीसंघटनेचा व्याप पेशावर ते मदुरा व क्वेट्टा ते कलकत्त्यापर्यंत पसरला आहे.

( स्वतःचे डेपो : मुंबई–गोवा–बंगलोर–दिल्ली )

वरील माल तयार करणाऱ्या महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा कारखाना

दि आयडिअल इन्स्टिट्यूट

४५, प्रिंसेस स्ट्रीट, मुंबई २.

—कारखान्याच्या वाढीसाठी ठेवी घेणें आहेत.—



–दररोज वापरण्यासाठीं लागणारें–

# लोणी आणि चक्का

खात्रीलायकपणें मिळण्याचें पुण्यांतील

—प्रमुख ठिकाण—

बेडेकर ब्रदर्स, पुणें, ८६७ सदाशिव पेठ, पुणें.



भांडवल सुरक्षितपणें व किफायतशीरपणें गुंतविण्याचें

—आदर्श ठिकाण—

# चितळे ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस् लिमिटेड

मॅनेजिंग एजंटस:—चितळे ब्रदर्स

रजिस्टर्ड ऑफिस-वेस्टर्न इंडिया हाऊस, सर फेरोजशहा मेथा रोड, कोट, मुंबई.

वाढत्या धंद्यासाठी कंपनी खालील दरानें ठेवी स्वीकारते.

| ठेवी— | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मुदत वर्षे | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| व्याजाचा दर | ४ | ४॥ | ५ | ५॥ | ६ |

अधिक माहितीसाठी आजच वरील पत्त्यावर लिहा.

# " भरीव योजनांचा पाया-दर्शकांक "

( ले० तात्या तेंडुलकर, कोल्हापूर )

२

५. दर्शकांकांचे उपयोग जसे अनेक आहेत, तसें ते तयार करण्याच्या पद्धतींहि अनेक आहेत. जो दृष्टिकोन किंवा उद्देश डोळयासमोर ठेवून हे दर्शकांक तयार केले जातात, त्याप्रमाणें या पद्धतींत थोडाफार बदल होतो. असें असलें तरी मुळभूत अशीं तत्त्वें एकच आहेत. आपणां सर्वांस माहीतच आहे कीं कोणत्याहि एका वस्तूच्या किंमती, ह्या तत्संबंधीं अनेक घटकांवर अवलंबून असतात. हें लहानसहान घटकच ( Components ) यांवर कमीअधिक परिणाम करतात. घरगुती उदाहरणच द्यावयाचें झाल्यास भाताचें घेऊं. तांदूळ, पाणी व विस्तव हे भाताचे तीन घटक आहेत. यांचा योग्य संयोग झाल्यास भात उत्कृष्ट होतो. पण त्यांत पाणी चढ किंवा कमी झालें, किंवा विस्तव अधिक लागला तर त्याचे कमी जास्त परिणाम हे भातावर होतात. म्हणजे घटक हे मुख्य वस्तूवर परिणाम करूं शकतात. उदाहरण घेऊनच दर्शकांक स्पष्ट करावयाचा झाल्यास, आपणांस गूळ तयार करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा दर्शकांक काढावयाचा आहे, असें मानूं. अर्थात् गूळ तयार करण्यासाठी येणारा खर्च हा मजुरीचे दर, शेतासाठी द्यावा लागणारा खंड, सरकारी कर, बी-बियाणावरील खर्च, खतें व इतर लहानसहान बाबींवर ( घटकांच्या किंमतीवर ) अवलंबून आहे. हींहि गोष्ट अनुभवानें सर्वांस माहीत आहे कीं, यांतील प्रत्येक घटकांच्या किंमती सारख्याच प्रमाणांत वाढत नाहींत किंवा उतरत नाहींत. कांहींच्या वाढतात, कांहीं आहेत तशाच राहतात, तर कांहीं उतरतात. पण या सर्व किंमतींचा किंवा खर्चाचे घटकांचा गुळासाठी येणाऱ्या वरखर्चावर परिणाम हा होतोच. तसेंच, या खर्चाचे हिश्शेरशीत या प्रत्येक बाबीचें सारखेंच महत्त्व नाहीं. कारण गूळ तयार करण्यासाठी येणाऱ्या खर्चांत मजुरीचाच हिस्सा मोठा असतो. म्हणून इतर किंमतींतील फेरफारांपेक्षां मजुरीचे दरच गुळाचे उत्पादनखर्चावर अधिक परिणाम करतात. यास्तव दर्शकांक तयार करतांना यांस त्याचें योग्य असें " महत्त्व " ( Weightage ) द्यावें लागतें. कारण दर्शकांकांत ' महत्वमापन ' हा एक प्रमुख भाग आहे.

' दर्शकांक ' हें तुलना किंवा मोजमाप करण्याचें साधन आहे. ही तुलना दुसऱ्या कोणत्यातरी निश्चित काळाशीं, देशाशीं किंवा उत्पादनांशीं किंवा आपण स्वतः कोठें आहोंत, हें जाणण्यासाठी आपल्या स्वतःशींच कांहीं कालांतरानें करावयाची असल्यानें, त्यांत कालनिश्चिति व स्थळनिश्चिति या आवश्यक बाबी असतात. आजच्या काळांत जर आपण गुळासाठी येणाऱ्या खर्चाचा दर्शकांक तयार केला किंवा राहणीच्या मानाचा दर्शकांक तयार केला व या आकड्यांशीं आपण पुनः ५ किंवा ६ वर्षांनीं तुलना केली तर गुळाचे खर्चाचे आकड्यांत फारच घट झाल्याचें आढळून येईल व ज्यास आजची येथील परिस्थिति माहीत नाहीं असा इसम, कोल्हापुरांतील गुळावरील खर्चांत गेल्या ५।६ वर्षांत फारच बचत करण्यांत आली आहे, तेथें गूळ करण्याच्या पद्धतींत अनेक सुधारणा झालया असल्या पाहिजेत, असें अनुमान बांधील. तर राहणीचा दर्शकांक बराच घटल्याचें आढळून आल्यास, येथील परिस्थिति बरीच खालावली आहे असें तो म्हणेल.

स्थलकालनिश्चितीनंतर दर्शकांकांत महत्त्वाची बाब म्हणजे कोणकोणत्या वस्तु हा अंक तयार करतांना आवश्यक आहेत याचा विचार करून त्या त्यांत सामील करणें वा वगळणें, हें ठरविणें ही होय. एखादा इसम दररोज दारूवर दोन रुपये खर्च करीत असेल व त्याचें दारूशिवाय चालतहि नसेल म्हणून कांहीं आपण इकडील राहणीचा अंक तयार करतांना दारूवरील खर्च ही बाब त्यांत जमेस धरणार नाहीं, कारण बहुजनसमाजाची ती गरज नाहीं किंवा तिची आवश्यकताहि नाहीं. ही अशी निश्चितता केल्यानंतर ज्या बाबींसंबंधीं आपणांस दर्शकांक तयार करावयाचा आहे, त्या बाबींसंबंधीं एक तपशीलवार प्रश्नपत्रिका तयार करावयाची. ती त्या त्या क्षेत्रांतील प्रातिनिधिक अशा संस्थांकडून किंवा व्यक्तींकडून सार्थंत भरून घ्यावयाची. या प्रश्नपत्रिका हातीं येतांच त्यांचें पृथक्करण, वर्गीकरण व महत्त्वमापन झाल्यावर जो अंक तयार होईल त्यास भरून आलेल्या प्रश्नपत्रिकेच्या अंकानें भागिल्यास जो अंक मिळतो तो त्या संस्थेचा किंवा वर्गाचा सरासरी असल्यानें, तोच प्रातिनिधिक किंवा दर्शकांक मानला जातो.

**योजना व दर्शकांक**

वरील विवेचनावरून दर्शकांक ( Index numbers ) म्हणजे काय किंवा तो कसा तयार केला जातो, हें लक्षांत येईल. आतां कोल्हापूर संस्थानापुरताच मर्यादित विचार करतों:-

( अ ) निरनिराळ्या प्रकारच्या प्रमुख अशा औद्योगिक उत्पादनासाठी येणाऱ्या खर्चाचा,

( आ ) प्रमुख असा शेतीविषयक कच्चा माल तयार करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा,

( इ ) लहान व घरगुती धंदे-माल तयार करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा,

( ई ) निरनिराळया प्रकारच्या कच्च्या मालास येणाऱ्या ठोकबंद ( wholesale ) भावाचा,

( उ ) रहाणीचे माननिदर्शक-( I ) सर्वसाधारण,<br>(II) औद्योगिक मजूरवर्ग,<br>(III) खेड्यावरील राहणी.

( ऊ ) निरनिराळ्या प्रकारच्या मालास असणाऱ्या मागणी व पुरवठा यांचा दर्शकांक तयार केल्यास तो उपयुक्त होईल.

यापैकीं प्रत्येक बाबीचा अत्यंत थोडक्यांत विचार करतों:-

बाब ( अ ) आपणांस इकडे पक्क्या मालाच्या उत्पादनासाठी किती खर्च येतो, इतर ठिकाणीं किती येतो, यांमध्यें कोणकोणत्या बाबींवर वाजवीपेक्षा अधिक खर्च होतो, त्यांमध्यें कपात कशी करतां येईल, कोणत्या गोष्टींत सुधारणा होणें आवश्यक आहे वगैरेचें निदर्शन करील. आपला हा अंक इतर ठिकाणच्या अंकापेक्षा कमी आल्यास या धंद्याचे वाढीस येथें भरपूर क्षेत्र आहे याचें निदर्शन करील व त्याप्रमाणें योजना आंखाण्यास मदत करील. तसेंच हा अंक इतर ठिकाणचे अंकांपेक्षा अधिक असल्यास येथें या धंद्याचे वाढीस क्षेत्र नाहीं व त्या दृष्टीनें प्रयत्न करूं नयेत याचें जसें निदर्शन करील तसेंच, आपणांस वेळींच इशारा देऊन जागें करील; ' सुधारा नाहीं तर मागें पडाल, मृतवत् व्हाल ! ' असें दर्शवील.

( आ ) व ( ई ) शेतकऱ्यास माल तयार करण्यासाठी किती खर्च येतो; त्याचे मोबदल्यांत त्याचे पदरांत काय पडतें याचें निदर्शन करील. इतर ठिकाणीं किती खर्च येतो व येथें किती येतो, इतका येथें कां ? सुधारणा कोणत्या होणें आवश्यक आहे हें दर्शवील. तसेंच शेतीच्या कोणकोणत्या क्षेत्रांत किती व

कोणत्या प्रमाणांत वाढ केली पाहिजे व कोणत्या प्रकारची (कापूस, तंबाखू, मिरची, गूळ वगैरे) वाढ थांबविली पाहिजे याचेंहि निदर्शन करील. तसेंच या कच्च्या मालाचें येथल्या येथेंच पक्क्या मालांत रूपांतर करतां येणें शक्य आहे किंवा कसें हेंहि दाखवील. भावांत होणारे चढउतार व निरनिराळ्या पेठांत त्यांस येणारी किंमत, यांचें निदर्शन करून, कोणत्या हंगामांत व कोठें माल विकल्यास फायदेशीर होईल, यांचें शेतकऱ्यास निदर्शन करील.

(इ) हा अंक आपणांस दोन ठिकाणच्या उत्पादनावरील किंमतींतील फेरफार दाखवील. यांत्रिक निर्मितीच्या मालांतील किंमती व घरगुती रित्या तयार केलेल्या मालाच्या किंमती यांतील फेरफार दर्शवील. कोणता धंदा अधिक किफायतशीर आहे व कोणत्या काळांत, याचें निदर्शन करील. या किंमतींत असे फेरफार कां याचें निदर्शन करून सुधारणा सुचवील व कोणचे धंदे वाढविण्यावर आपण भर दिला पाहिजे हें अचूक रित्या सांगेल.

(उ) जलद व स्वस्त वहातुकीचीं साधनें, ज्या प्रमाणांत वाढत जातात त्या प्रमाणांत राहणीचें मान निदर्शक आकडा सर्वत्र एकाच पातळींत (Level) येत जातो. आजच्या स्थितींत विचार करितां, कोल्हापूरचें राहणीचें मान अनेक कारणांमुळें मुंबईपेक्षा अधिक महागाईचें आहे. म्हणजे मुंबईचा दर्शकांक २४२ असल्यास कोल्हापूरचा दर्शकांक यपेक्षा ४० ते ५० नीं अधिक असेल. हा नंबर तयार करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे मजुरांचे किमान वेतनाचा दर ठरविणें हा असतो. हिंदुस्थान सरकारनें किमान वेतनाचें बिल मध्यवर्ती असेंब्लीपुढें मांडलें असून तें सर्व हिंदुस्थानाला लागू होणार असल्यानें कोल्हापूरच्या जीवन-वेतनाचा अंक तयार होणें अत्यंत आवश्यक आहे. कारण हा कायदा कोल्हापुरलाहि लागू होण्याचा संभव आहे. वरवर पाहणारांस मुंबईचे अंकच येथें लागू करण्यास हरकत वाटत नाहीं. परंतु खरोखरच आपले राहणीचा खर्च मुंबईइतका आहे, कमी आहे किंवा अधिक आहे याची पाहणी होणें आवश्यक आहे. कारण ही गोष्ट सर्वांस माहीत आहे, कीं सर्वच चकाकणाऱ्या वस्तु सोनें आहेत किंवा कशा हें पाहण्यासाठीं त्या जशा कसावर लावणें आवश्यक आहे, नाहींतर फसगत व्हावयाची, त्याचप्रमाणें येथील राहणीचे मानाचा आकडा प्रत्यक्ष चौकशी करूनच ठरविणें आवश्यक आहे.

(ऊ) 'मागणी व पुरवठा' यांचा इंडेक्स नंबर (दर्शकांक) तयार करणें जरा बिकट आहे. कोल्हापूर संस्थान हें लहान असून त्यांत चोहों बाजूंनीं माल येतो व बाहेर जातो, अशी स्थिति असल्यानें, मागणी व पुरवठा यांचा अंदाज ठोकळ मानानेंहि बांधणें कठीण आहे. तरी पण लोकमत ज्या प्रमाणांत सुशिक्षित व प्रभावी होत जाईल, त्या प्रमाणांत हा अंक तयार करणें सोपें जाईल. हा अंक आपल्या परिस्थितीची व लोकांच्या अभिरुचीची कल्पना आणून देईल. कोणच्या प्रकारच्या मालास, कोणत्या हंगामांत किती मागणी असते, याचा अंदाज लागल्यास त्याप्रमाणें उत्पादनाचा व विक्रीचा कार्यक्रम आखणें सोपें जाईल.

अशा तऱ्हेची शास्त्रशुद्ध पाहणी व आकडेवारी हा भरीव, परिणामी व दीर्घकालीन योजनांचा पाया आहे. योजना शास्त्रशुद्ध असाव्यात. त्या सत्य परिस्थितीवर आधारलेल्या जाव्यात व लोकांच्या खऱ्याखुऱ्या गरजा भागविण्यास समर्थ असाव्यात अशी जी अपेक्षा आहे ती पुरी होण्यासाठीं व पुढें आमची आमच्याशींच तुलना करतां यावी व या प्रगतीचें अचूक मोजमाप घेतां यावें म्हणून असें कार्य होणें आवश्यक असतें. समाप्त


ओलक ] फाफ मशिनच्या तोडीचीं [ ओलक

ओलक शिवण्याचीं यंत्रें

☞ रोखीनें अगर हप्त्यानें मिळतात. ☜

लिहा अगर भेटाः—व्ही. आर. बापट, ओलक मशिन कं., लकडी पुलाजवळ, लक्ष्मीरोड, पुणें नं. २

बिनचूकच्या माहितीनें

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो


प्रत्यक्ष माहिती मोफत —— किंमत ४ आणे

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—

भायखळा पुल, मुंबई नं. २७.

——— : स्टॉकिस्ट पाहिजेत : ———

पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २७३८२

पैसा आणि ज्ञान वाढवा!

श्रीमंत कसें व्हावें?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक! किं. १ रु.

—आजच लिहा—

मेसर्स—विपट आणि मंडळी, पो० कराड, जि. सातारा.

लहान मुलांकरितां आर्को गोड —एरंडेल— वापरा

: लक्ष्मी एजन्सी :

मंगळवार पेठ, कोल्हापूर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, (पो ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.